| | |
|---|---|
| **MHRG040028852022** | **नियमित दिवाणी दावा क्र.२५५/२०२२**<br>**गुरूनाथ राघो कडव वगैरे**<br>**वि.**<br>**आत्माराम सुदाम भगत वगैरे** |

## निशाणी क्र. १२७ खालील आदेश
## (दि.११/०८/२०२६)

अर्जदार वादीचे म्हणणे थोडक्यात असे आहे की, वादीने सदर दावा हक्क घोषित करणे व वाटप यासाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्यामध्ये पूर्वी अर्ज क्र. १२३ वर आदेश २३ नियम १ अन्वये अर्ज करून, दाव्याच्या अनुसूचीतील काही मिळकती दाव्यातून वगळण्याची परवानगी मागितली होती. सदर अर्जावर दिनांक २५/०६/२०२६ रोजी आदेश होऊन वादीस दाव्यात आवश्यक दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात आलेली आहे.

२. वादीचे पुढील म्हणणे असे आहे की, वरील आदेशानुसार प्रतिवादी क्र. ५ व ६ यांच्या नावे असलेल्या मिळकती दाव्यातून कमी/वगळणे आवश्यक आहे. त्यामुळे दाव्याच्या शीर्षकातून प्रतिवादी क्र. ५ व ६ यांची नावे कमी करणे तसेच त्यांच्याशी संबंधित दाव्यातील मजकुरात आवश्यक ती दुरुस्ती करणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे दाव्याच्या परिच्छेद क्र. १४ मधील काही मजकूर, ज्यामध्ये संबंधित सोसायटीचे नाव नमूद आहे, तो देखील वगळणे आवश्यक असल्याचे वादीचे म्हणणे आहे.

३. तसेच दाव्याच्या परिच्छेद क्र. १५, १६ व १७ मध्ये नमूद केलेल्या प्रतिवादींच्या क्रमांकामध्ये आवश्यक ती दुरुस्ती करून प्रतिवादी क्र. ७ ते १० यांची नावे त्याऐवजी नमूद करण्याची मागणी करण्यात आली आहे. दाव्याच्या प्रार्थना कलमामध्येही त्यानुसार आवश्यक दुरुस्ती करणे गरजेचे असल्याचे वादीचे म्हणणे आहे.

याशिवाय दाव्याच्या कलम २४ मधील खरेदीखताच्या तारखांमध्येही आवश्यक दुरुस्ती करण्याची मागणी करण्यात आली आहे.

४. वादीचे म्हणणे आहे की, सदर दुरुस्त्या केवळ यापूर्वी पारित झालेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी व दाव्यातील आवश्यक बाबी अचूक करण्यासाठी मागण्यात येत असून, त्यामुळे दाव्याच्या मूळ स्वरूपामध्ये कोणताही बदल होणार नाही. सदर अर्जासाठी आवश्यक न्यायालयीन शुल्क व कोर्ट फी भरलेली आहे. त्यामुळे वादीने आदेश ६ नियम १७ तसेच आदेश १ नियम १०(१) अन्वये सदर दुरुस्तीचा अर्ज मंजूर करून दाव्यात मागितल्याप्रमाणे आवश्यक दुरुस्ती करण्याची परवानगी द्यावी, अशी विनंती केली आहे.

५. प्रतिवादी क्र. १ यांनी प्रस्तुत अर्जास तीव्र आक्षेप घेत म्हणणे मांडले आहे की, वादींकडून वेगवेगळ्या प्रकारचे नवीन अर्ज वारंवार दाखल करून न्यायालयाचा मौल्यवान वेळ वाया घालविला जात आहे. वादींनी सदर दावा वाटपासाठी दाखल केला असून, दाव्यातील मिळकती वंशपरंपरागत असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे वादींना प्रस्तावित दुरुस्ती करण्याची परवानगी देता येणार नाही, असा प्रतिवादी क्र. १ यांचा आक्षेप आहे. तसेच, आदेश ७ नियम ११ सी.पी.सी. अंतर्गत दाखल अर्जाच्या सुनावणीस विलंब करण्याच्या उद्देशानेच वादींनी प्रस्तुत अर्ज दाखल केला असल्याने, प्रस्तुत अर्ज फेटाळण्यात यावा, अशी प्रतिवादी क्र. १ यांनी विनंती केली आहे.

६. प्रतिवादी क्र. ५ व ६ यांनी प्रस्तुत अर्जावर आपले म्हणणे दाखल करून, सदर अर्जाबाबत न्यायालयाने योग्य तो आदेश पारित करावा, अशी विनंती केली आहे.

७. प्रस्तुत अर्ज, प्रतिवादी क्र. १ यांनी दाखल केलेले म्हणणे तसेच प्रतिवादी क्र. ५ व ६ यांनी दाखल केलेले म्हणणे यांचा विचार केला. दोन्ही पक्षांच्या विद्वान अधिवक्त्यांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुत अर्जाद्वारे वादींनी दाव्यात आवश्यक दुरुस्ती

करण्याची मागणी केली आहे. सदर दुरुस्तीमध्ये दाव्याच्या अनुसूचीतील काही मिळकती वगळणे, त्यानुषंगाने प्रतिवादी क्र. ५ व ६ यांच्या नावांमध्ये आवश्यक बदल करणे, दाव्यातील संबंधित मजकुरामध्ये दुरुस्ती करणे तसेच प्रार्थना कलम व इतर संबंधित मजकुरामध्ये परिणामी दुरुस्ती करणे यांचा समावेश आहे. वादींच्या म्हणण्यानुसार सदर दुरुस्ती ही यापूर्वी न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने तसेच दाव्यातील आवश्यक बाबी अचूक करण्यासाठी आवश्यक आहे.

८. प्रतिवादी क्र. १ यांनी सदर अर्जास तीव्र विरोध केला आहे. वादी विविध प्रकारचे अर्ज दाखल करून न्यायालयाचा मौल्यवान वेळ वाया घालवीत आहेत, असा त्यांचा मुख्य आक्षेप आहे. तसेच सदर दावा हा वाटपासाठी दाखल करण्यात आला असून, दाव्यातील मिळकती वादींनी वंशपरंपरागत मिळकती असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे आता प्रस्तावित दुरुस्ती करण्यास वादींना परवानगी देता येणार नाही, असा प्रतिवादी क्र. १ यांचा युक्तिवाद आहे. प्रस्तुत अर्ज हा केवळ आदेश ७ नियम ११ सी.पी.सी. अंतर्गत प्रलंबित अर्जाच्या सुनावणीस विलंब करण्याच्या उद्देशाने दाखल करण्यात आला असल्याने तो खर्चासह फेटाळण्यात यावा, अशी विनंती त्यांनी केली आहे. प्रतिवादी क्र. ५ व ६ यांनी प्रस्तुत अर्जाबाबत योग्य तो आदेश पारित करण्याची विनंती केली असून, त्यांनी अर्जास कोणताही ठोस विरोध केलेला नाही.

९. प्रतिवादी क्र. १ यांनी घेतलेला हा आक्षेप की, दाव्यातील मिळकती वंशपरंपरागत असल्याचे वादींचे म्हणणे असल्याने प्रस्तावित दुरुस्ती करता येणार नाही, हा या टप्प्यावर स्वीकारता येणार नाही. दाव्यातील मिळकती वंशपरंपरागत आहेत किंवा नाहीत, त्यामध्ये वादींचा हक्क अथवा हिस्सा आहे किंवा नाही आणि वादींना मागितलेला दिलासा मिळण्याचा अधिकार आहे किंवा नाही, हे सर्व मुद्दे दाव्याच्या गुणदोषांशी संबंधित आहेत. प्रस्तुत अर्जाचा विचार करताना न्यायालयास त्या मुद्द्यांवर अंतिम

निष्कर्ष काढणे अपेक्षित नाही. प्रस्तावित दुरुस्तीचा विचार करता, वादी दाव्याच्या स्वरूपामध्ये पूर्णपणे नवीन दावा किंवा नवीन कारण निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत, असे प्रथमदर्शनी दिसून येत नाही. प्रस्तावित दुरुस्ती ही प्रामुख्याने दाव्यातील मिळकती, पक्षकारांची नावे, संबंधित मजकूर व प्रार्थना यामध्ये आवश्यक व परिणामी बदल करण्याच्या स्वरूपाची आहे. सदर दुरुस्तीमुळे पक्षकारांमधील वास्तविक वादग्रस्त प्रश्न प्रभावीपणे निश्चित करण्यास मदत होणार आहे.

१०. प्रतिवादी क्र. १ यांनी प्रस्तुत अर्ज केवळ आदेश ७ नियम ११ सी.पी.सी. अंतर्गत अर्जाच्या सुनावणीस विलंब करण्यासाठी दाखल केल्याचा आक्षेप घेतला आहे. मात्र, केवळ असा आरोप केल्यामुळे आवश्यक असलेली दुरुस्ती नाकारता येणार नाही. प्रस्तावित दुरुस्तीचा आदेश ७ नियम ११ सी.पी.सी. अंतर्गत प्रलंबित अर्जावर काय परिणाम होतो, हा प्रश्न त्या अर्जाच्या सुनावणीच्या वेळी कायद्यानुसार विचारात घेता येईल. प्रस्तुत अर्जाचा निर्णय घेताना आदेश ७ नियम ११ सी.पी.सी. अंतर्गत अर्जाच्या गुणदोषांवर कोणतेही मत व्यक्त करणे आवश्यक नाही.

११. प्रस्तावित दुरुस्तीमुळे प्रतिवादींना कोणतीही न भरून येणारी हानी होणार आहे, असेही प्रतिवादी क्र. १ यांना दाखवून देता आलेले नाही. दुरुस्ती मंजूर केल्यानंतर प्रतिवादींना सुधारित दाव्यानुसार आपला बचाव मांडण्याची संधी उपलब्ध राहणार आहे. त्यामुळे आवश्यक ती संधी देऊन होणारा संभाव्य पूर्वग्रह टाळता येऊ शकतो. तथापि, प्रतिवादी क्र. १ यांनी वादींकडून वारंवार अर्ज दाखल करून कार्यवाहीस विलंब होत असल्याचा आक्षेप घेतला आहे. सदर आक्षेप पूर्णपणे दुर्लक्षित करता येणार नाही. वादींनी त्यांच्या दाव्यातील आवश्यक बाबी योग्य प्रकारे व योग्य वेळी मांडणे अपेक्षित होते. त्यामुळे प्रस्तावित दुरुस्ती न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असली, तरी प्रतिवादी क्र. १ यांना झालेल्या गैरसोयीची भरपाई करण्यासाठी खर्च लावणे उचित

ठरेल.

१२.        वरीलप्रमाणे एकूण परिस्थितीचा विचार करता, प्रस्तावित दुरुस्ती ही पक्षकारांमधील वास्तविक वादाचा प्रभावी आणि संपूर्ण निर्णय घेण्यासाठी आवश्यक आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याचे मूलभूत स्वरूप बदलत नाही तसेच प्रतिवादींच्या बचावाचा कोणताही मूलभूत अधिकार हिरावला जात नाही. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने प्रस्तुत अर्ज मंजूर करणे योग्य ठरेल. मात्र, कार्यवाहीतील विलंब व प्रतिवादी क्र. १ यांना झालेली गैरसोय लक्षात घेता, अर्ज खर्चासह मंजूर करणे उचित आहे. त्यानुसार, प्रस्तुत अर्ज रुपये २,०००/- खर्चासह मंजूर करणे योग्य आहे. सदर रुपये २,०००/- खर्च वादींनी प्रतिवादी क्र. १ यांना अदा केल्यास न्यायचे संतुलन होणार आहे. या अनुषंगाने मी पुढील प्रमाणे आदेश पारित करत आहे-

## आदेश

१. अर्ज खर्च रु. २०००/- वर मंजूर करण्यात येत आहे.

२. वादींना अर्जात नमूद केल्याप्रमाणे दाव्यात आवश्यक दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

३. वादींनी सदर रुपये २,०००/- खर्च प्रतिवादी क्र.१ यांना पुढील तारखेपुर्वी अथवा तारखे दिवशी अदा करावा.

४. वादींनी सुधारित दाव्याची प्रत १४ दिवसांच्या मुदतीत दाखल करावी.

VAISHALI RAJENDRA HANGARGEKAR
Digitally signed by VAISHALI RAJENDRA HANGARGEKAR
Date: 2026.08.11 15:44:14 +0530

दिनांक : ११/०८/२०२६

(वैशाली हंगरगेकर)
सह-दिवाणी न्यायाधीश (व.स्तर),
पनवेल.